## प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager )पद भरती

### उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,यवतमाळ

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत प्रभागसंघ व्यवस्थापक (CLF Manager ) या पदाकरिता यवतमाळ जिल्हातील यवतमाळ,झरी जामणी,दारव्हा,वनी,केळापूर या तालुक्यातील ५ आदर्श प्रभागसंघाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रति आदर्श प्रभागसंघ १ प्रभागसंघ व्यवस्थापक पद भरण्यात येईल. भरती बाबत तालुका व प्रभागसंघनिहाय सविस्तर विवरण पुढीलप्रमाणे

| अ.क्र | तालुक्याचे नाव | प्रभागाचे नाव | आदर्श प्रभागसंघाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | हिवरी अकोला (बा) | निरंतर |
| २ | दारव्हा | बोरी (अ) | उडान |
| ३ | वणी | राजूर चिखलगाव | राजमाता |
| ४ | केळापूर | पहापळ | झाशीची राणी |
| ५ | झरी जामणी | पाटण | नारीशक्ती |

सदर पदाकरिता पात्रता निकष खालीलप्रमाणे

१,अर्जदार महिला "उमेद" स्वयंसहाय्यता गटाची सदस्य असावी.

२.कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३.वय किमान २२ वर्ष कमाल ४० वर्ष असावे. (वयाची परीगणना जाहीरात प्रसिद्ध झाली त्या दिनांकापासून करण्यात येईल )

४.उमेद अभियान अंतर्गत गटाचा हिशोबनीस,ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल, समुदाय स्तरीय लेखापरीक्षक,प्रेरीका,वरिष्ठ वर्धिनी,बँक सखी,आर्थिक साक्षरता सखी,पशु सखी,कृषी सखी.मत्स्य सखी ,वन सखी,मास्टर कृषी सखी,कृषी उद्योग सखी कृतीसंगम सखी,कृषी व्यवस्थापक,पशु व्यवस्थापक,BDSP(उमेद अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) म्हणून काम करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.(अनुभवाची परीगणना जाहीरात प्रसिद्ध झाली त्या दिनांकापासून करण्यात येईल )

५.उमेदवार ज्या प्रभागाकरीता अर्ज करणार आहे त्या प्रभागातील मुळची रहिवासी असणे आवश्यक आहे.

६.स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणारी तसेच इंग्रजी,हिंदी भाषेमध्ये लिहण्यास व वाचण्यास सक्षम असावी.

७.संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल याकरिता संगणक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

८.उत्तम सुसंवादी,नेतृव गुण,असलेली व गरीब कुटुंबाच्या प्रश्नांवर संवेदनशीलतेने काम करणारी असावी.

९.प्रभाग संघाचे कार्यकारी समिती सदस्य(EC) पदाधीकारी यांच्या कुटुंबातील नसावी.

१०.स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये (PRI) सदस्य नसावी.

११.अंगणवाडी सेविका,मदतनीस,आशा कार्यकर्ती म्हणून कार्यरत नसावी.कोणत्याही शासकीय संस्था/स्वयंसेवी संस्था(NGO) मध्ये सेवा देणारी नसावी.

१२. स्वतःचे गाव सोडून नेमून दिलेल्या गावामध्ये प्रवास करून क्षेत्रकार्य करण्याची तसेच बाहेर गावी प्रशिक्षण,कार्यशाळा इ.करिता उपस्थित राहण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

१३.ज्या गट व ग्रामसंघाची सदस्य आहे,तो गट ग्रामसंघ A किंवा B श्रेणीतील असणे आवश्यक आहे.

१४. वंचित कुटुंबातील सदस्य विधवा,परितक्त्या,अ.जा.,अ.ज आदिम जमाती एसइबीसी इ प्रवर्गातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल

वरील निकषानुसार पात्र महिलांनी सदर पदासाठी अर्ज करावा.सदर पद हे प्रभागसंघस्तरीय असून ११ महिन्याच्या करार तत्वावर भरण्यात येणार आहे. प्रभागसंघ व्यवस्थापक यास प्रती महिना रु ६०००/- मानधन व अधिक प्रवास खर्च रु.१५००/- संबंधित प्रभागसंघमार्फत अनुज्ञेय राहील अर्जाचा नमुना प्रभागसंघ स्तरावर/तालुका स्तवर उपलब्ध असून दि.29/07/2026 हा अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिवस आहे.तरी इच्छुक उमेदवार यांनी आपला अर्ज तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ,दारव्हा,वणी,केळापूर ,झरी जामणी, येथे कार्यालयीन वेळेत दि-29/07/2026रोजी साय. ६.१५ पर्यंत सादर करावा.विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाही.याची नोंद घ्यावी.

जिल्हा अभियान सहसंचालक तथा
प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
जि.प. यवतमाळ

Scanned with OKEN Scanner